## <u>रे.दि.मु.क्र. २७८/२०२१ मधील निशाणी क्र. १५ खालील आदेश</u>

प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज तिला दाव्याची लेखी कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करून तिचे विरुद्ध दिनांक १७/०६/२०२२ रोजी झालेला विना कैफियतचा आदेश रद्दबातल करून तिची लेखी कैफियत अभिलेखावर स्वीकारण्यात यावी याकरिता दाखल केला आहे. वादीतर्फे प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागील बाजूसच त्याचे म्हणणे दाखल केले आहे.

२) प्रस्तुत अर्जात प्रतिवादीने असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरूद्ध विवाह विच्छेदन होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी ही वयोमानानुसार नेहमी आजारी असते. तसेच तिला दम्याचा व सांधेदुखीचा त्रास आहे. त्यामुळे वेळेत कागदपत्र उपलब्ध करून विधिज्ञांना माहिती देणे अशक्य झाल्याने तिला वेळेत कैफियत दाखल करता आले नाही. त्यामुळे कैफियत दाखल करण्यास ५ महिने १७ दिवसांचा विलंब झालेला आहे. म्हणून मे. न्यायालयाने प्रतिवादीविरूद्ध कैफियत नाही असा आदेश केला आहे. सदरचा दावा हा वैवाहिक संबंधी असल्याने प्रतिवादीची कैफियत मे. न्यायालयात दाखल होणे आवश्यक व जरुरीचे आहे. सदरचे काम विना कैफियत आदेशावर चौकशी झाल्यावर प्रतिवादीवर घोर अन्याय होऊन तिचे वैवाहिक हक्क व हितसंबंधावर गदा येणार आहे. याउलट प्रतिवादीची कैफियत दाखल झाल्यास न्यायाचे दृष्टीने उचित होणार आहे व न्यायदानाकामी देखील एक प्रकारे मदतच होणार आहे. सबब, झालेला विलंब माफ होऊन प्रतिवादीविरुद्ध झालेला विना कैफियतचा आदेश रद्दबातल होऊन तिची लेखी कैफियत दाखल करून घ्यावी अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

३) वादीतर्फे प्रस्तुत अर्जास असे प्रतिकथन केले आहे की, प्रतिवादीने पोटगीसाठी फौ.कि.अर्ज क्र. ४५७/२०१५ याच मे. न्यायालयात दाखल केला आहे. त्यामुळे सदर अर्जास दिलेले कारण व विलंबा बाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. तसेच दिलेले कारण मोघम असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. जर यदाकदाचित मे. न्यायालय अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत आल्यास प्रतिवादीस कॉस्ट करण्यात यावा.

४) अर्ज व म्हणणे वाचले. संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५) प्रकरण संचिकेचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा विवाह विच्छेदन (तलाक) होऊन मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादीने अर्जात नमूद केलेली कारणे ही सारासार बुद्धीच्या आधारे विचारात घेण्यासारखी आहेत. तसेच उभय पक्षकारांमधील वाद विषयाचे स्वरूप विचारात घेतले असता वाद विषयाचे अंतिमतः गुणदोषावर निराकरण करण्यासाठी आणि नैसर्गिक न्यायतत्त्वाआधारे प्रतिवादीला तिचे म्हणणे मांडण्याची संधी देणे जरुरीचे आहे. तसे न केल्यास प्रकरणात निष्कारण गुंतागुंत निर्माण होवून प्रकरणांची अनेकता देखील होण्याची शक्यता आहे. सबब, प्रतिवादीला तिची कैफियत अभिलेखावर दाखल करण्याची संधी देणे जरुरीचे आहे असे माझे मत आहे. सबब, प्रतिवादीने अर्जासोबत विलंबाने दाखल केलेली कैफियत अभिलेखावर घेणे जरुरीचे वाटते. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीस दावा समन्सची बजावणी दि. २०/०१/२०२२ रोजी झाल्यानंतर ती दि. १६/०२/२०२२ रोजी प्रकरणात हजर झाली आहे. त्यानंतर तिचे विरुद्ध दिनांक १७/०६/२०२२ रोजी विना कैफियतीचा आदेश झाल्यानंतर त्यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दि. ०७/१०/२०२२ रोजी दाखल केला आहे. अशाप्रकारे तिला कैफियत दाखल करण्यासाठी झालेल्या एकूण विलंबाच्या कालावधीचा सारासार विचार करता वाद विषयाचे अंतिमतः निराकरण करण्यासाठी आणि नैसर्गिक न्यायतत्त्वाआधारेही प्रतिवादीला तिचे म्हणणे मांडण्याची संधी देणे जरुरीचे आहे. त्यामुळे प्रकरणातील सर्व परिस्थितीचा व वरील सर्व कारणांचा विचार केला असता प्रतिवादीने वादीला खर्चाची एकूण रक्कम रुपये २००/– देण्याचे आदेशीत केल्यास न्यायोचित समतोल साधला जाईल असे माझे मत आहे. वरील सर्व कारणांचा विचार करून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने वादीला खर्चाची एकूण रक्कम रू. २००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने वादीला वर आदेशीत केल्याप्रमाणे खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर त्यांचे विरुद्ध दिनांक १७/०६/२०२२ रोजी

झालेला विना कैफियतीचा आदेश रद्दबातल करून तिची लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करून तिने या अर्जासोबत दाखल केलेली कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

३. अनुषंगिक आदेश निशाणी क्र. १ खाली पारित करण्यात यावा.

EKNATH KOYAPPA CHOUGALE

Digitally signed by EKNATH KOYAPPA CHOUGALE
Date: 2022.11.10 12:22:51 +0530

स्थळ:– जत
दि. ०५/११/२०२२

(एकनाथ को. चौगले)
(JO Code -MHSN2400)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जत

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस. ए. जमादार (लघुलेखक श्रेणी–III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | ०५/११/२०२२. |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | ०५/११/२०२२. |
| आदेश अपलोड केलेली तारीख | १०/११/२०२२. |